
स्वातंत्र्य-युद्धाचीं नीति-त



निरपेक्ष देशसेवा हा प्रस्तुत काळाचा युगधर्म आहे. —म. गांधी.

स्वातंत्र्य-युद्धाचीं नीति-तत्त्वें.

लेखक

श्रीयुत रामराव जोतिराव शिंदे,

संगीत ‘सत्यानाश’, ‘वीरबाला’
इत्यादि नाटकांचे कर्ते.

आवृत्ति पहिली.

जुलै १९३० इ.

किंमत १॥ आणा.

किंमत २ आणे.

समर्पण

सत्य हें ज्यांच्या धर्माचें अधिष्ठान, शांति हें ज्यांच्या
धर्मांतील स्थैर्य, प्रेम हें ज्यांच्या धर्माचें चैतन्य,
संहारावांचून जगांतील अस्वस्थतेचा
उपसंहार व्हावा
हेंच
ज्यांचें अवतार कार्य,
त्या जगत्श्रेष्ठ

महात्मा गांधींना

हें नीती-पुष्प

अर्पण

करीत आहे.

विनीत,
—लेखक.

No 27 of 19 Recd on 27/9/30

प्रार्थना.

—०:०:०—

म. गांधींजींची सत्याग्रहाची चळवळ हिंदुस्थानाच्या कोनाकोपऱ्यांत जाऊन भिडली आहे. असें एकहि खेडेगांव नाहीं, कीं ज्यांत ह्या चळवळीचा शिरकाव झाला नाहीं.

अनत्याचारी तत्वावर **म. गांधींची** फार श्रद्धा असून सत्याग्रहाची वा सविनय कायदेभंगाची चळवळ त्याच केवळ पवित्र तत्वावर चालली पाहिजे, यावर व्यक्तिशः त्यांचा फार कटाक्ष आहे. अत्याचाराची व असत्याची त्यांना अत्यंत चीड असून ते त्याचा आजवर निषेधच करीत आले आहेत. " नीती हें सत्याग्रहाचें मुख्य अंग होय. म्हणून नीतीचें शिक्षण व नीतीविषयीं आदरभाव लोकांत उत्पन्न झाला पाहिजे... ...सत्याग्रहामध्यें कोणत्याहि प्रकारची दंगल माजविण्याची अगर अत्याचाराची कल्पनाहि येऊं शकत नाहीं. " असें त्यांचें स्पष्ट मत आहे. इतकेंच काय पण मागें **चौरीचुऱ्याला** अत्याचार घडला त्यावेळीं सत्याग्रहाची चळवळ त्यांनीं एकदम थांबविली ! चालू चळवळींत **पेशावर, दिल्ली, सोलापूर** वगैरे भागांत घडलेल्या अत्याचाराबद्दल त्यांनीं खेदच व्यक्त केला असून " **सत्यमेव जयते** " या सर्व मान्य तत्वाचीही पुनरपि घोषणा केली आहे. परंतु ह्या घोषणेचें मर्म किती जणांच्या गळीं उतरलें आहे बरें ?

कांहीं थोडे प्रमुख पुढारी व कार्यकर्ते वगळले, तर स्वातंत्र्याच्या चळवळींत भाग घेणाऱ्या बाकींच्या पैकीं फारच थोड्या लोकांना सत्याग्रहाच्या स्वरूपाची व अनत्याचारी तत्वांची कल्पना आलेली असेल. समजावून घेऊन, समजून उमजून चळवळींत शिरणाऱ्या अगर भाग घेणाऱ्या लोकांपेक्षां भावनावश होऊन तींत सामील होणाऱ्या अगर झालेल्यांचेंच संख्याधिक्य अधिक असल्याचें आढळून येईल. ही स्थिति चांगली कां वाईट हें सांगण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु त्या योगानें खेड्यांपाड्यांत किंबहुना शहरांत देखील घडून येणाऱ्या अखेर परिणामाकडे लक्ष देतां, सध्या आहे हीच स्थिति पुढें चालू दिली—ती सुधारली नाहीं—तर ती अधिक बिकट व धोक्याची होईल, असें वाटतें.

सद्यःस्थिति सुधारण्याचें अगर तीस इष्ट असें वळण लावण्याचें एकदां पटल्या-नंतर त्या बाबतींत अर्थात्च वेगवेगळ्या योजना व मार्ग असूं शकतील. आमच्या मतें, सत्याग्रहाच्या चळवळींत भाग घेतलेल्या व घेऊं इच्छिणाऱ्या पुढारी, कार्यकर्ते, व खेड्यांतून दौरे काढणारे स्वयंसेवक या सर्वांनींच सत्याग्रहाच्या अनत्याचारी तत्वांचें विविक्षित सिद्धांतरूप पद्धतीवर मनन व ग्रहण केलें पाहिजे, व तेंच अनुयायीवर्गाला उपदेशिलें पाहिजे. एरव्ही माहितीची पुंजी थोडी आणि डौल मोठा, अशा कित्येक चांगल्या शिकल्यासवरलेल्या लोकांची अवस्था त्यांच्या भाषणांतून होत असलेली आम्ही डोळ्यांनीं पाहिली आहे! त्याचा परिणाम अज्ञ लोकांवर अखेर कसा काय होणार, हें न सांगतांहि समजण्यासारखें आहे.

हा अनवस्थ प्रसंग टळावा, यासाठीं **म० गांधी** हेच सत्याग्रहाचे जनक व प्रवर्तक असल्याकारणानें त्यांचीं आजवर जीं चरित्रें, भाषणें, व लेख प्रसिद्ध झालें आहेत, त्यांतील सत्याग्रह व अनत्याचारी तत्त्वांसंबंधांचीं उत्तमोत्तम **नीति-तत्त्वें** निवडून काढून तीं एकत्र करून छोटयाशा पुस्तकरूपानें सर्वांपुढें ठेविलीं आहेत. हीं **नीतितत्त्वें** सत्याग्रहाच्या चळवळींत भाग घेणाऱ्या एकूण एक लोकांनीं अवश्य वाचावीं, व शक्यतर खेड्यांपाड्यांतूनहि त्यांचा प्रसार करावा. सर्वांना पुस्तकें विकत घेतां यावीं म्हणून **पुस्तकाची किंमतहि अगदींच थोडी ठेविली आहे.**

प्रस्तुत पुस्तकांतील नीतितत्वाप्रमाणें सत्याग्रहींनीं व त्यांच्या अनुयायांनीं तंतोतंत आचरण केल्यास अत्याचार मुळींच घडणार नाहींत. त्या योगें **म. गांधींना**-हि समाधान वाटेल. आणि सरकार व लोक यांच्या सहनशिलतेसहि फाजील ताण न पडतां देशाची सात्विक आकांक्षा अल्पावधींत तृप्त होईल, अशी सबळ आशा आहे.

आंग्रेवाडा, शुक्रवार पेठ
पुणें शहर.
ता. १-८-३०

रामराव जोतिराव शिंदे.

स्वातंत्र्य-युद्धाचीं नीति-तत्त्वें.

तत्व १ लें--जो सत्य जाणतो व जो कायावाचामनेंकरून सत्याचरण करतो तोच परमेश्वराला ओळखतो; व त्यामुळें तो त्रिकालज्ञानी होतो. त्याला या देहींच मोक्ष मिळतो.

* * * *

तत्व २ रें—असला एकच सत्याचरणी जरी तयार झाला तरी स्वराज्य आज आहे. आपणांमध्यें कांहीं नांवाचे सत्याग्रही आहेत. सत्याचरणाचा आग्रह धरणारे कांहीं आहेत, आणि त्यांचीसुद्धां वाणीच्या सत्यापर्यंत क्वचितच मजल पोंचली आहे. असा विचार केला असतां सत्यवंताचें पालन करणें, ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं.

* * * *

तत्व ३ रें--सुळावर चढविले तरीसुद्धां सत्य आहे तसेंच चमकलें पाहिजे. सत्याग्रही चुकूनसुद्धां असत्य बोलत नाहीं, व आचरत नाहीं. तो असत्य भाषण करण्यास अगर आचरण्यास असमर्थ होऊन जातो.

* * * *

तत्व ४ थें—ज्याचें जीवनचरित्र सत्यमय आहे, तो शुद्ध स्फटिक मण्यासारखाच असतो. त्याच्याजवळ असत्य एक क्षणभरसुद्धां टिकाव धरूं शकत नाहीं. कारण त्याच्याजवळ असत्य बोलणें हें अशक्यच झालें पाहिजे. जगामध्यें अत्यंत बिकट असें सत्यव्रतच होय. लक्षावधि लोक प्रयत्न करोत. त्यांपैकीं थोडेजणच ह्याच जन्मीं तें पार पाडूं शकतात.

* * * *

तत्व ५ वें––देहाचें क्षणभंगुरत्व न जाणणें, आणि अभिमान धरणें, हें शक्य आहे. पण ज्याला हें कळलें, त्याचा गर्व नाहींसा होतो. सत्याचरण हा मार्ग शूर लोकांचा आहे. तेथें भ्याडांचें काम नाहीं. अहर्निश जो प्रयत्न करील, खातां, बसतां, शयन करतां, दरेक क्रिया करतांना जो केवळ सत्याचेंच चिंतन करील, तो अवश्य सत्यमय बनेल; आणि जेव्हां सत्याचा भानू एकाद्याच्या अंतःकरणांत आपले बारा डोळे उघडून प्रकाशतो, तेव्हां तो दडून रहात नाहीं; त्याला बोलावें लागत नाहीं, किंवा समजून सांगावें लागत नाहीं. त्याच्या बोलण्यामध्यें इतकी शक्ति किंवा चैतन्य उत्पन्न झालेलें असतें कीं, त्याची छाप इतरांवर ताबडतोब बसते.

* * * *

तत्त्व ६ वें––"सत्यमेव जयते" जोंपर्यंत सत्याकरितांच मरण्याला एक तरी इसम तयार आहे, तोंपर्यंत सत्याविरुद्ध क्रोडों सैन्य आलें तरी त्या सत्याचाच जय होणार !

* * * *

तत्व ७ वें––असल्या शुद्ध सत्याचें संपूर्णरीतीनें पालन करणारा एक मनुष्य जरी निघाला तरी स्वराज्य मिळालेंच पाहिजे; कारण तो सांगेल तें सर्वांना मानणेंच भाग पडतें. असल्या प्रकारच्या सत्याचा आग्रह धरणारे थोड्या फार अंशानें जरी आपण असलों तरी आपण स्वराज्य मिळवूं शकूं. आपण थोडे जरी असल्या सत्याविषयीं दृढ आग्रही झालों तरीही स्वराज्य मिळेल. पण आपण अंतःकरणपूर्वक सत्याग्रही असलें पाहिजे. सत्याच्या ऐवजीं सत्याचें ढोंग चालणार नाहीं.

* * * *

तत्व ८ वें––सत्यामध्यें सर्व धर्मांची सीमा आहे. सत्य हाच परमेश्वर होय. सत्यापेक्षां श्रेष्ठ असा दुसरा कोणताही धर्म नाहीं

"सत्यापरता नाहीं धर्म, सत्य तेंचि परब्रह्म." सत्य हा नाजुक शब्द आहे. ज्याला त्याचा उपयोग करतां येणार नाहीं, तो आपला सभ्यपणा व अब्रु गमावून बसेल. त्याची पत जाईल. संबंध रुपयापैकीं एक आणा असला तरी हरकत नाहीं; पण तें सत्यच असलें पाहिजे. स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नाच्या धर्मयज्ञामध्यें आपण सर्वजण सत्यव्रत बनूं, अशी महत्वाकांक्षा बाळगली पाहिजे.

* * * *

तत्व ९ वें--सत्याग्रह म्हणजे सविनय कायदेभंग करणें, एवढाच अर्थ जे समजतात, त्यांनीं सत्याग्रहाचें खरें स्वरूप ओळखलेंच नाहीं. सत्याग्रहाच्या सक्त नियमाखालीं कायदेभंग येऊं शकतो, हें जरी खरें असलें तरी ज्याला कायदा कसा पाळावा हें समजतें, तोच कायदे मोडण्याची कला जाणतो. स्वदेशी हा सत्याग्रह आहे; म्हणून त्याचें पालन व प्रचार भ्याड स्त्री-पुरुषांच्या हातून होणार नाहीं. हिंदुमुसलमानांमधील बंधुप्रेमाची कल्पना भ्याड प्रवृत्तीनें फैलावूं शकणार नाहीं. मुसलमानानें हिंदूच्या अगर हिंदूनें मुसलमानाच्या उरांत खंजीर भोसकला असतां, तो प्रहार सहन करून शांतपणें उभें राहाणें, हें भ्याडाचें खचित् काम नव्हे. ह्या दोन्ही गोष्टी साधतां आल्या तरी स्वराज्य मिळेल. आपण त्या मार्गानें जात असतां कोणी प्रतिबंध करूं शकणार नाहीं; आणि दोन्ही जाती धार्मिक होऊन हिंदुस्थानाला धर्माचा लाभहि सहज होईल.

* * * *

तत्त्व १० वें.—राज्य जावो, वतन जावो, कुटुंब जावो, प्राण जावो, पण सत्य न सोडणें, याचें नांव सत्याग्रह. सत्याग्रहाचा पंथच निराळा. तो विवेकांचा व सहनशिलतेचा मार्ग आहे. सत्याग्रहांत रागद्वेषांना थारा नाहीं. सत्याग्रहाचें प्रतिपक्षावर वजन

पडल्यामुळें त्याच्या मनांत अविश्वास उत्पन्न होत नाहीं. म्हणून भांडण असलें तरी दोन्ही पक्षांमध्यें मान व गोडीगुलाबी राखणें शक्य होतें. सत्याग्रह शब्दाचा मूळ अर्थ सत्याचा आग्रह असा आहे. म्हणजे तें सत्यबल आहे. सत्याग्रह हें अत्यंत बलवंताचें शस्त्र आहे. त्यामध्यें कोणत्याहि प्रकारची दंगल माजविण्याची कल्पनाहि येऊं शकत नाहीं. सत्याग्रह या शक्तीचा उपयोग करून वाटेल त्या अन्यायाविरुद्ध यश मिळवितां येतें.

* * * *

तत्त्व ११ वें—जे पुरुष किंवा स्त्रिया नात्याचे संबंध ओळखीत नाहींत, त्यांचा मनुष्यदेह असला तरी ते पशुसमान होत. कौटुंबिक नातीं जो जाणतो तो पाशवी कोटींतून कांहीं अंशीं मुक्त झाला. परंतु केवळ कुटुंबाच्या स्वार्थाखातर सर्व जग बुडालें तरी ज्याला पर्वा नाहीं तो अत्यंत क्षुद्र व पापी होय. याहून वरच्या दर्जाचीं माणसें आपल्या ग्रामबंधूंना आपल्या कुटुंबांतील माणसाप्रमाणें मानून त्याबाबत सत्याग्रयाचे नियम पाळतात; व कुटुंबांतील माणसाप्रमाणें एकमेकांत तंटाबखेडा करण्याऐवजीं प्रेम करतात, व स्वार्थत्याग करितात, व त्यांचेंच अनुकरण गांवकरी करतात.

* * * *

तत्त्व १२ वें—आपल्या शक्तीचा उपयोग व अब्रूचें रक्षण करण्याला आणि आचारस्वातंत्र्य भोगण्याला प्रत्येक प्रजाजनाला पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजें; आणि ज्या राज्यांत फारच थोडी सत्ता व अधिकार उपयोगांत आणला जातो, तें राज्य अति उत्तम होय! मोठ्या जनसमाजाच्या पुढाऱ्यांचा शब्द कोणतेंहि सरकार अथवा राज्य मोडूं शकत नाहीं. मग ते सरकार किंवा राज्य त्यांच्या अगदीं विरुद्ध मताचें असलें तरी हरकत नाहीं.

* * * *

तत्त्व १३ वें—सत्याकरितां दुःख भोगण्याला प्रजा तयार झाली म्हणजे खरी सत्ता सरकारची नसून प्रजेची होते. हें तत्त्व ओळखून प्रजा आपले सरकारविषयींचें वैषम्य कमी कमी करीत जाऊन सरकार हे लोकांच्या कल्याणाकरितां असलें पाहिजे असें प्रतिपादूं लागते.

* * * *

तत्त्व १४ वें.—स्वातंत्र्य मिळविण्याकरितां साक्षरता प्रसार करण्याची जरूर आहे, हें म्हणणें इतिहासाचें अज्ञान दाखवितें. मला माझें काम करतां आलें पाहिजे. ही भावना लोकांत उत्पन्न करण्याला साक्षरतेची कांहीं जरूर नाहीं.

* * * *

तत्त्व १५ वें:—सत्याग्रहाचा स्विकार ज्यावेळीं लोक घरोघर करूं लागतील त्यावेळीं आपल्या सर्व प्रवृत्ति निराळेंच स्वरूप धारण करतील. पुष्कळ धांदल, अगडबंब व्याख्यानें, कितीतरी अर्ज, ठरावांचीं भेंडोळीं, लबाड्यांचे गट्ठे, ह्या सगळ्या लटांबरांतून आपण एकदम मुक्त होऊं.

* * * *

तत्त्व १६ वें:—सत्याग्रहीला निराशा कधींच ठाऊक नसतें. सत्य हीच त्याची तरवार असल्यामुळें त्याला कधीं पोलादी तलवारींची किंवा दारुगोळ्याची गरज पडत नाहीं. तो आत्मबलाच्या, व प्रेमाच्या जोरावर शत्रुलासुद्धां जिंकतो. मित्रावर प्रेम करणें, यांत कांहीं आश्चर्य नाहीं; परंतु शत्रूशीं प्रेम करणें यांत पुरुषार्थ आहे. त्यांत खरें शौर्य लागतें.

* * * *

तत्त्व १७ वें:—अधिकारमदामुळें माणसाला स्वतःची चूक दिसत नाहीं. अशावेळीं सत्याग्रही हात जोडून स्वस्थ न बसतां

स्वतः दुःख सहन करतो. सत्ताधाऱ्यांचे हुकूम व कायदे तो सविनय अमान्य करतो, व त्यामुळें भोगावीं लागणारीं तुरुंग, फांशी वगैरे संकटें तो सहन करतो. अशारीतीनें आत्मा कार्यक्षम बनतो. यामध्यें कालक्षेप होत नाहीं, आणि अशारीतीनें सविनय कायदेभंगांत जर मागाहून चूक आढळून आली तर त्या चुकीचे परिणाम फक्त सत्याग्रही व त्याचे साथीदार भोगतात. यांमध्यें सत्ताधाऱ्यांशीं वांकडे-पणा उत्पन्न होत नाहीं. उलट शेवटीं ते आपणांस वश होऊन वागतात. सत्याग्रही माणसावर आपला अमल चालवितां येणें अशक्य होऊन त्यांच्या संमतीशिवाय आपणांस एकहि कार्य करून घेतां येणार नाहीं, असें त्यास आढळून येतें. ही स्वराज्याची परिसीमा होय. कारण संपूर्ण स्वातंत्र्याचा यांतच समावेश होतो.

* * * *

तत्व १८ वें--हिंदुस्थानांत दुसरीं शस्त्रें आहेत; परंतु या सत्याग्रह शस्त्राचा येथें विशेष उपयोग होणार आहे, व झालेला आहे. ही सर्व व्यापकशक्ति आहे. ज्याला ह्या शक्तीची जाणीव उत्पन्न होईल. तो तिचा उपयोग केल्याविना राहणारच नाहीं.

* * * *

तत्व १९ वें--सत्याग्रह शरीरसामर्थ्यापेक्षां अधिक तेजस्वी असून, त्यामुळें शरीरसामर्थ्य एखाद्या गवताच्या काडीप्रमाणें क्षुद्र आहे. शरीरसामर्थ्याची मुख्य गोष्ट अशी आहे कीं, बलवान मनुष्य स्वतःच्या शरीराची पर्वा न करतां लढाई करतो म्हणून तो भित्रा नव्हे. सत्याग्रही स्वतःच्या शरीरालाच कांहीं मानीत नाहीं. तेथें भीतीचा प्रवेशच होणें शक्य नाहीं. म्हणून त्याला बाह्य शस्त्राची गरजच नाहीं.

* * * *

तत्व २० वें--इतर देशांपेक्षां हिंदुस्थानांत सत्याग्रहाचें शस्त्र अधिक परिणामकारक होईल. कारण आपल्या पवित्र भूमीला त्या

प्रमाणेंच आपल्या लोकांच्या स्वभावाला अनुसरून असें हें शस्त्र आहे असें कोणालाहि वाटल्यावांचून राहणार नाहीं.

* * * *

तत्व २१ वें—हिंदुस्थानांत अन्याय घडत आहेत तोंपर्यंत क्षत्रियांना निद्रासुद्धां येणार नाहीं. सर्व लोकांनीं आत्मरक्षणापुरते क्षत्रिय बनलेच पाहिजे.

* * * *

तत्त्व २२ वें.—सत्याग्रह हें आत्म्याचें बल आहे. शस्त्रबल हें हिंसात्मक आहे, व तें सर्व धर्मांमध्यें निंद्य गणलें आहे. मोरोक्कोच्या लढाईंत फ्रेंचाविरुद्ध अरब लोक धर्मभावनेनें लढाईस निघाले होते. अरबांच्या धार्मिक भावनेमध्यें अज्ञानतः पण सत्याग्रह होता; आणि सत्याग्रहांत शत्रूमध्यें प्रेम उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असतें; म्हणून फ्रेंच गोलन्दाज अरबांचे शत्रू होते तरी त्यांनीं अरबांचा सत्याग्रह ओळखतांच त्यांच्यांत प्रेम उत्पन्न झालें; व तोफा डागण्याचें सोडून ते हर्षानें अरबांना भेटले. हा चमत्कार केवळ सत्याग्रहामुळेंच घडून आला.

* * * *

तत्त्व २३ वें.—सूक्ष्मदृष्टीनें पाहिलें असतां आपल्या ध्यानांत येईल कीं, सत्याग्रहाच्या योगानें आपणांला समाजसुधारणा करतां येईल. जातीजातींतील दोष नाहींसें करितां येतील. हिंदुमुसल्मानांतील वितुष्ट नाहींसें करून एकी वाढवितां येईल; व राजकीय प्रश्नहि सोडवितां येतील.

* * * *

तत्त्व २४ वें.—राजकीय प्रश्नांशीं धर्माचा किंवा समाजसुधारणेचा संबंध नाहीं, असें म्हणणें अयोग्य आहे. धार्मिक वृत्तीनें राजकीय प्रश्नाचा केलेला निकाल एक प्रकारचा होईल, व धार्मिक

वृत्तीला फाटा दिल्याचा परिणाम दुसऱ्या प्रकारचा होईल. राजकीय प्रश्नांचा विचार करीत असतां भटकत फिरणाऱ्या छपन्न लाख अज्ञात साधु लोकांना विसरतां यावयाचें नाहीं. मुसलमान भाईनींहि आपल्या फकिरांचा विचार सोडून चालावयाचें नाहीं. हिंदु समाजाला विधवांचा प्रश्न किंवा बालविवाहाचा विचार केला पाहिजे. दोन्ही जाती परस्परांसंबंधीं जे प्रश्न उपस्थित करतात त्यांच्याकडेहि कानाडोळा करून चालणार नाहीं.

* * * *

तत्त्व २५ वें--खरोखर आपल्या अडचणी हिमालय एवढ्या आहेत. पण त्या दूर करण्यासाठीं योग्य असे सुंदर उपायहि आपल्याजवळ आहेत. आपण प्राचीन आर्यांचे वंशज आहोंत. रोम, ग्रीस, इजिप्त वगैरे देशांच्या संस्कृतींच्या क्षयाचे आपण साक्षी आहोंत. आपल्या संस्कृतमध्यें समुद्राप्रमाणें अनेक भरत्याओहोट्या झाल्या आहेत, तथापि समुद्राप्रमाणेंच ती अचल राहिली आहे.

* * * *

तत्व २६ वें--आपल्या देशांत अगदीं स्वतंत्र राहतां येण्यासारखी सर्व सामुग्री आहे. त्यांत मोठमोठाले पर्वत आहेत, नद्या आहेत, अप्रतिम सृष्टिसौंदर्य आहे. ह्या मातृभूमीचे अनेक पुत्र मोठ्या पराक्रमाचा वारसा ठेवून गेले आहेत. आपला देश तपश्चर्येचें माहेरघर आहे. येथेंच सर्व धर्म एकत्र राहतात. येथें सर्व लोक देवतांना मान देतात. एवढी सामुग्री असतां जर आपण कांहीं अलौकिक कार्य करून जगाला शांति देऊं शकलों नाहीं, इंग्रज लोकांना आपण सत्याग्रही वृत्तीच्या सात्विक प्रवृत्तीनें जिंकू शकलों नाहीं; तर आपण आपल्या पूर्वजांच्या नांवाला बट्टा लावल्यासारखें होईल !

* * * *

तत्व २७ वें--ब्रिटीश प्रजेपाशीं रडगाणें गाईल्यानें स्वराज्य मिळणार नाहीं. त्या मागणीच्या पाठीशीं हिंदीप्रजेचा आत्मिक व नैतिक जोर पाहिजे. जेव्हां हिंदुस्थानांतले एकूण एक लोक स्वराज्य म्हणजे काय तें जाणतील, व त्यासंबंधाचीं आपापलीं कर्तव्यें निमुटपणें करूं लागतील, तेव्हांच स्वराज्य तुमच्या घरीं चालत येईल.

* * * *

तत्व २८ वें— नीति हें सत्याग्रहाचें मुख्य अंग होय; म्हणून नीतीचें शिक्षण व नीतीविषयीं आदरभाव लोकांत उत्पन्न झाला पाहिजे. लोकसमुदाय झपाट्यानें सत्याग्रही बनत चालला तरी सरकारनें घाबरण्याचें मुळींच कारण नाहीं. कायद्याला मान देणें हें आपलें कर्तव्य आहे. म्हणून लोकसंग्रह होईल असेच कायदे पास करणें हें कायदे करणाराचें कर्तव्य आहे.

* * * *

तत्त्व २९ वें--लढाईतील वीर जसा मृत्यूला शोधीत असतो तसे सत्याग्रहीनें कैद किंवा तुरुंगवास यांच्या पाठीस लागले पाहिजे. आपल्या हजारों लोकांच्या तुकड्या सरकारच्या एकाच माणसाच्या इशारतीनें सरकारी तुरुंगांत गेल्या पाहिजेत. त्यांतच आपला जय आहे. गुन्ह्याखेरीज पकडले जावून सरकारच्या तुरुंगांत बसण्यांतच आपला जय आहे. आपण जितके निर्मळ अंतःकरणानें व निर्दोष वृत्तीनें तुरुंगांत जाऊन कैद भोगूं तितकें आपलें युद्धबल वाढेल व तितकाच विजय आपण जवळ करूं.

* * * *

तत्त्व ३० वें--सत्याग्रहीला कुटुंबाची माया सोडावी लागते, ही गोष्ट फार कठीण आहे. भूक, तहान, थंडी, ऊन हीं सहन करावीं लागतात. पैशावर पाणी सोडावें लागतें. दुःख सहन करीत असतां, पैसा गमावला असतां, तुरुंगांत जातांना, माझ्या कुटुंबाचें

काय होईल, हा शोक किंवा शंकाहि मनांत येऊं देतां कामा नये. ज्यानें दांत दिले आहेत तो चणे देईलच. सर्प, विंचू, वाघ, लांडगे वगैरे भयंकर प्राण्यानांहि जो खावयास देतो, तो मनुष्य जातीला विसरणार नाहीं.

* * * *

तत्त्व ३१ वें—सत्याग्रहीनें तुरुंगाला महाल समजलें पाहिजे. सत्याग्रही तुरुंगांतील अधिकाऱ्यांचीं मनधरणीहि करीत नाहीं, व कृपेची याचनाहि करीत नाहीं.

* * * *

तत्त्व ३२ वें—तुरुंगांत जाणाऱ्या सत्याग्रहींच्या अंगीं खालील गुणांची जरूर आहे. (१) व्यसनापासून दूर राहाणें, (२)शरीर सदृढ व कसलेलें राखणें, (३) निजण्याच्या बाबतींत चोंचलें नसणें, (४) खाण्यांत अत्यंत साधेपणा राखणें, (५) खोटा अभिमान गुंडाळून ठेवणें, (६) धैर्य धरणें.

* * * *

तत्त्व ३३ वें--जे तुरुंगांत जातांच दिवस मोजूं लागतात, त्यांना ते फारच मोठे वाटतात. बाहेर आपण वर्षेंच्या वर्षें फुकट घालविलीं तरी तीं लक्षांतहि येत नाहींत. तुरुंगांतील तीन दिवस हे तीन वर्षांप्रमाणें वाटतात. असें कां ? याचें उत्तर इतकेंच कीं, तुरुंगांत जाणें आवडत नाहीं. तुरुंगांत जाण्यांत सुख मानलें पाहिजे.

* * * *

तत्त्व ३४ वें--सत्याग्रहाच्या लढाईत पराभव नसतोच. अमुक गोष्ट साध्य झाली नाहीं तर आपणांस दिसून येतें कीं, त्यांत सत्याग्रहीचा कच्चेपणा आहे; सत्याग्रहाचा नव्हे.

* * * *

तत्त्व ३५ वें--जो हुकूम ज्ञानतः अन्यायी अथवा जुलमी

वाटेल त्या हुकुमाचा प्रतिकार करण्याचा प्रजेला जन्मसिद्ध हक्क आहे; व तो बजावणें, हें तिचें कर्तव्य होय.

* * * *

तत्त्व ३६ वें—देखावा करून दाखविण्यांत आपण आजवर कसूर केलेली नाहीं. हिंमतबहाद्दरांनीं वचनें बोलण्याचीं बाकी ठेवलेली नाहीं; परंतु हिंमतीचीं कामें हातून घडतील काय ? कैद्यांना सोडवून आणण्याचें, स्वराज्य मिळविण्याचें, यश मिळवाल काय ? तुरुंगांत तरी जाल कां ? क्रोधाला बळी पडल्याशिवाय मारझोड सहन कराल ? मरणाला तयार व्हाल ? मनाची बरोबर समजूत पडली तर हा केवळ हातचा मळ आहे. नाहींपेक्षां एखादा पहाड तोडण्यापेक्षांही कठीण आहे.

* * * *

तत्त्व ३७ वें—मनानें, वाचेनें, कायेनें, शांतता पाळावयाची. भंग्यालाही आपल्या सख्या भावाप्रमाणें वागवावयाचें. पारशी, यहुदी, ख्रिस्ती, व सहकारी यांच्याशीं विवेकपूर्वक मायेनें वागावयाचें. शेजारीं इंग्रज गृहस्थ असला तर त्याच्याशीं कोणत्याही प्रकारचा विरोध करावयाचा नाहीं. स्वदेशीचें शुद्ध पालन करावयाचें; खादीचेंच कपडे वापरावयाचे; सत्यासाठीं—सत्याकरितां—तुरुंगांत जावयाचे; मार खावयाचा; व प्रसंग आल्यास मरायलाही तयार व्हावयाचें. या प्रतिज्ञेचें अक्षरशः पालन करीत असतांना ज्याला मृत्यू येईल तोच जगेल व आपल्या देशाला जगवील. दुसरे पुष्कळ मेले असतील, डोकीं फोडून घेतलीं असतील, व तुरुंगांतही गेले असतील; परंतु त्यांनीं कांहीं हिंदुस्थानला शोभविलें नाहीं; त्यांनीं हिंदुस्थानला तारिलें नाहीं; परंतु मारिलें आहे. गुन्हेगाराच्या दुःखानें, त्यांच्या आसवांनीं, हिंदुस्थानचें रोगनिवारण होण्यासारखें नाहीं. या देशाच्या रोगावर रामबाण उपाय म्हणजे निर्दोष लोकांचें बलिदान हाच होय.

* * * *

तत्त्व ३८ वें—सीतादेवीसारख्या सतीला रावण पकडून घेऊन गेला; व राक्षसी राज्याचा समूळ नाश झाला. त्याऐवजीं त्यानें एखाद्या वेश्येला पळवून नेली असती; तर वेश्येचें पूजन करणाऱ्या त्या रावणाचें, किंवा तिचें, कोणी स्मरणही केलें नसतें. दुष्टाला अधिकाधिक झालेल्या शिक्षेमुळें जगताचा थरकांप होत नसतो; परंतु निर्दोषी माणसाच्या एखाद्या केसालाही जरी धक्का लागला तरी जगाला तें कृत्य एक क्षणभरही सहन करतां येत नसतें.

* * * *

तत्त्व ३९ वें—तुम्हीं पुरुष असा अथवा स्त्री असा; तुमच्यामध्यें नवजीवन येऊं द्या. कमावलेलें जीवन क्षणार्धांत गमवून बसूं नका. ही लढाई असत्याच्या, पायावर उभारलेली नाहीं; येथें पाखंडाला वाव मिळणार नाहीं; येथें दगेखोरपणा चालणार नाहीं. तुमची जबाबदारी फार मोठी आहे. नम्रता, सभ्यता, सत्य, शौर्य, उदारता, सद्विचार, सद्भाषण, व सद्वर्तन, या गुणसमुच्चयाच्या बळावर ही लढाई आपणांला जिंकावयाची आहे.

* * * *

तत्व ४० वें— देशोन्नतीच्या मार्गावर कधींहि गुलाबाचीं फुलें पसरून ठेवलेलीं नसतात. तो मार्ग अत्यंत बिकट, कष्टप्रद, आणि वेळोवेळीं मनाला निरुत्साह करणाराच असावयाचा. अशा मार्गानें जाऊनच अखेर उन्नतीचा गड जिंकावा लागतो. संशयपिशाच्य प्रथम घालवून द्या. आत्मश्रद्धेची कास धरा. आत्मिकतेज मलीन होऊं देऊं नका. म्हणजे तुमचें इच्छित तुम्हांला खात्रीनें प्राप्त होईल.

समाप्त.

प्रकाशक,
रा. रा. रामराव जोतिराव शिंदे,
३७८ शुक्रवार पेठ, आंग्रेवाडा,
पुणें शहर.

मुद्रक,
रा. रा. शंकर नरहर जोशी,
चित्रशाळा प्रेस, घ. नं. १०२६
सदाशिव पेठ, पुणें शहर.